# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मुंबईतील दादर शिवाजीपार्क मैदानातील धूळ प्रदुषण रोखण्याबाबत

**(१) ४०९ (२८-०४-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवाजीपार्क येथील मैदानात क्रिकेटच्या खेळपट्टयांवर सराव आणि सामने होत असून फेरफटका मारण्यासाठी अनेक जण येत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने मुंबई महानगरपालिकेने, मैदानात हिरवळ कायम ठेवणे, धूळ उडण्याचे प्रमाण कमी करणे यासाठी शिवाजी पार्कचे नुतनीकरण करण्याचा निर्णय शासनाने आठ ते नऊ वर्षापूर्वी घेण्यात आला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठ ते नऊ वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रकरणी कायमचा तोडगा न काढल्यामुळे सदर प्रकल्प कार्यान्वित न करताच त्याऐवजी महानगरपालिकेने त्याबाबतचा मातीकाम व अन्य कामाबाबतचा प्रस्ताव आयआयटीकडे पाठवून त्यांचा अहवाल आल्यानंतरच कार्यवाही करण्यात येईल असे महानगरपालिका आयुक्त यांचेकडून सांगण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आयआयटीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास केव्हा, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) शिवाजी पार्क नुतनीकरणाबाबत निर्णय घेण्यात आला नाही. तथापि, स्थानिक रहिवाशांकडून धुळीच्या प्रदूषणाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नियुक्त सल्लागाराच्या अहवालानुसार शिवाजीपार्क येथील मैदानात सन २०२०-२१ व इतर वर्षात मैदानात हिरवळ कायम ठेवणे, धुळ उडण्याचे प्रमाण कमी करणे याकरीता पर्जन्य जलवाहिनीचे जाळे (Perforated pipes covered with geotextile membrane), ३५ रिंगवेल बांधणे, ठिकाणी सल्लागाराने मैदान समतल सदर करणे, सुचविल्याप्रमाणे लाल माती टाकणे, गवत / लॉन लावणे अशी कामे करण्यात आली.

(२) व (३) शिवाजी पार्क येथील धुळीच्या समस्येबाबत महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळाने दिनांक २०.०३.२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार आय. आय. टी. मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. आय. आय. टी. मुंबई यांनी शिवाजी पार्क येथील मातीच्या विविध नमुन्यांची चाचणी करुन दिनांक २८.०१.२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस अंतरिम अहवाल सादर केला.

आय.आय.टी. मुंबई यांच्या अंतरिम अहवालाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शिवाजी पार्क मैदानामध्ये धुळीवर नियंत्रण राखण्याकरीता दररोज रात्री पिण्या अयोग्य पाण्याची फवारणी (Sprinkling) करण्यात येते. सल्लागार संस्थेकडून अद्याप अंतिम अहवाल प्राप्त झाला नाही.

---

## मुंबईत अनेक ठिकाणी सामान्य नागरीकांना पदपथाचा वापर करता येत नसल्याबाबत

**(२) १०५६ (०१-०५-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-

(१) मुंबईत अनेक ठिकाणी अरुंद पदपथ, खोदकाम, अनधिकृत फेरीवाले यामुळे सामान्य नागरिकांना पदपथाचा वापर करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदपथ चालण्यायोग्य व्हावेत यासाठी महानगरपालिकेने युनिव्हर्सल पदपथ धोरण आखण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते व त्यावरील पदपथांचे ऑडीट महानगरपालिकेकडून करण्याचे योजिले असता अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा. उच्च न्यायालयात दाखल जनवादी हॉकर्स सभा विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर तसेच मा. उच्च न्यायालयाच्या सु-मोटो जनहित याचिका क्र. ०१ / २०२३ मध्ये दिनांक २४.०६.२०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशानुसार एकुण २० वर्दळीची ठिकाणे निश्चित करण्यात आली असुन, सदर ठिकाणे फेरीवाला मुक्त ठेवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहे.

मा. उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी होणाऱ्या सुनावणीनुसार पारित होणारे आदेश / निर्देश यांच्या अनुषंगाने पुढील कारवाई / कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

रस्त्यांचे सुरक्षात्मक लेखा परिक्षण करण्याकरीता शहर, पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे विभागांसाठी सुरक्षा लेखा परिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे व त्यांचे अभिप्राय प्राप्त झाले असून सदर बाबत पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच दिव्यांगाच्या दृष्टीने ऑडिट करणे बाबत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जोगेश्वरी (पूर्व ) क्षेत्रामध्ये अपुरा पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(३) १३२९ (०१-०५-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये अपुरा पाणी पुरवठा होत असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, के/पूर्व विभागात कांतीलाल कंपाऊड, हंजर नगर, मेघवाडी, शामनगर, कोकणनगर, प्रेमनगर, अग्रवालनगर, प्रतापनगर, फ्रांन्सीसवाडी, चाचानगर, बांद्रेकरवाडी, मकानी पाडा या ठिकाणी अत्यंत अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी जलअभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, वरळी, मुंबई यांना पत्राद्वारे सदर बाब निदर्शनास आणूनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त विभागामध्ये होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठयाबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्याअनुषंगाने नियमित पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे,

कांतीलाल कंपाऊंड व हंजर नगर हा परिसर के/पूर्व विभागातील जोगेश्वरी (पूर्व) येथे स्थित असून या परिसरास वेरावली-२ जलाशयाद्वारे नियोजित वेळेत पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच मेघवाडी, श्यामनगर, कोकण नगर, अग्रवाल नगर, प्रताप नगर, फ्रांसिसवाडी, चाचा नगर, बांद्रेकरवाडी, मकरानी पाडा हा परिसर के/पूर्व विभागातील जोगेश्वरी (पूर्व) येथे स्थित असून, सदर परिसरास वेरावली-१ जलाशयाद्वारे नियोजित वेळेत पाणीपुरवठा करण्यात येतो.
(३) हे खरे नाही.
(४) नमूद परिसरांतील पाणीपुरवठा हा वेरावली १ व २ जलाशयांच्या जलपातळीवर अवलंबून असतो. सद्यस्थितीत सदर जलाशयांत आगमवाहिनीद्वारे होणा-या पाणीपुरवठ्यात वाढ करण्यात आली असून जलाशयांत आवश्यक जल पातळी नियंत्रित होत आहे. सदर परिसरातील गळत्या शोधून त्या त्वरीत दुरुस्त करण्यात आल्या. तसेच जलवाहिनींवरील झडपांचे आवश्यक फेरबदल व एअर व्हाल्व ब्लीडींग करण्याची कामे करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर परिसरात पुरेसा पाणीपुरवठा होत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मार्वे टी जंक्शन ते मढ जेट्टी मालाड (पश्चिम) मुंबई या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४) १४२८ (२३-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मार्वे टी जंक्शन ते मढ जेट्टी मालाड (पश्चिम) मुंबई या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम गत २ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ता रुंदीकरणाचे काम तातडीने पूर्ण करणे व सदरच्या रस्त्यावरील वाहतुक कोंडी दूर करण्याच्या व बाधितांचे पुनर्वसन, भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) मार्वे टी जंक्शन ते मढ जेट्टी मालाड (पश्चिम) मुंबई या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सद्यस्थितीत प्रगतिपथावर आहे.
(२) सदर बाबतीत प्रथमत: अक्सा गाव परिसरातील एकूण ६७ बाधित बांधकामधारकांना नोटिस देण्यात आली असून तद्‌अनुषंगाने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यांच्या पडताळणीअंती प्रस्तुत अहवालानुसार सद्यस्थितीत ४० बाधित बांधकामांचे प्रारूप परिशिष्ट- II (Draft Annexure-II) तयार करून प्रदर्शित करण्यात आले आहे. सदर बाधितांचे पुनर्वसन, भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करून देण्याच्या दृष्टीने अंतिम परिशिष्ट तयार करून बांधकामांची पात्र / अपात्रता ठरविल्यानंतर प्रचलित धोरणांनुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील भगवती रुग्णालय व कुपर रुग्णालयात मज्जासंस्थेच्या विकाराचे निदान व शस्त्रक्रिया करुन उपचार करणारे तज्ञ तसेच इतर सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(५) १७९३ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भगवती रुग्णालय दहिसर – पूर्व, मुंबई उपनगर येथे कुपर रुग्णालय, विलेपार्ले व बोरिवली पर्यंत कुठल्याही

रुग्णालयात मज्जासंस्थेच्या विकाराचे निदान व शस्त्रक्रिया करुन उपचार करणारे तंज्ञ व संबधित अतिदक्षता विभाग, ओपीडी उपलब्ध नसून तसेच या रुग्णालयांचे नुतनीकरण करतांना नियोजन करण्यात आले नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान संबधित विभागाकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) डॉ.रु.न.कूपर रुग्णालय हे वैद्यकीय महाविद्यालय असून येथे मज्जासंस्थेच्या विकाराचे ओपीडी उपलब्ध आहे व मज्जासंस्थेच्या विकाराचे निदान व शस्त्रक्रिया करुन उपचार करणारे तज्ञ डॉक्टर व संबंधित विभाग (न्युरोलॉजी व न्युरोसर्जरी) उपलब्ध आहेत. तसेच, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय कांदिवली (प.) तसेच, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा रुग्णालय जोगेश्वरी येथे मज्जासंस्थेच्या विकाराचे निदान व शस्त्रक्रिया करुन उपचार करणारे तज्ञ डॉक्टर्स व संबंधित अतिदक्षता विभाग तसेच बाहयरुग्ण विभाग उपलब्ध आहे.
हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर मनपा रुग्णालय येथे मज्जासंस्थेच्या विकाराचे निदान व शस्त्रक्रिया करुन उपचार करणारे तज्ञ न्युरोसर्जरी विभाग व बाहयरुग्ण विभाग उपलब्ध आहे. न्युरोसर्जरी बाह्यरुग्ण विभाग दर मंगळवार व गुरुवार सकाळी ९ ते १२ वाजता हया वेळेत कार्यरत असतो. न्युरोसर्जरी डॉक्टर मज्जासंस्थेच्या विकारा संबंधित रुग्णांवर शस्त्रक्रिया करतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**(जि. धाराशिव) येडशी येथील रामलिंग अभयारण्य व वनपर्यटन विकसित करण्याबाबत**

**(६) २४८५ (२६-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येडशी (जि.धाराशिव) येथील रामलिंग अभयारण्य वनपर्यटन म्हणून विकसित करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभयारण्य शासनाने २२३७.५ हेक्टर क्षेत्राला 'संरक्षित क्षेत्र' म्हणून घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नायगावच्या मयूर अभयारण्याचे वन हे दक्षिण उष्ण कटिबंधीय शुष्क पानगळीच्या काटेरी वन, प्रजातीची अनेक पक्षांच्या नोंदी झाल्या असून रामलिंग अभयारण्यात जटायूची समाधी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या ठिकाणी हील स्टेशन सारखा अनुभव येत असल्यामुळे तेथे पावसाळयामध्ये निसर्गरम्य वातावरण पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अभयारण्य व वनपर्यटन विकसित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२५-११-२०२५) :**(१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) उपरोक्त कामाच्या अनुषंगाने विविध स्तरावरील चर्चेदरम्यान येडशी रामलिंगघाट अभयारण्यामध्ये वनपर्यटन विकसित करण्यासाठी वनपर्यटन आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी रोजगाराभिमुख शिक्षणाचे सार्वत्रिकरण योजनेबाबत**

**(७) २५३७ (२६-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामधील (केंद्र शासन पुरस्कृत) पदांना कायमस्वरुपी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त यांनी सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाने आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण या योजनेतील रिक्त असलेल्या २५२ पदांवर १०८ कर्मचाऱ्यांना समाविष्ट करण्याची सहमती होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागात रोजंदारी व तासिका तत्त्वावरील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १० वर्षे पूर्ण करण्यात येऊन नियमित करण्यात आले असून हे कर्मचारी मागील २० ते २२ वर्षे कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२२-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ११/१२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील पदांना कायमस्वरुपी न घेता मानधनावर घेण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता.

(२) सदर प्रस्ताव आदिवासी विकास विभागाच्या विचाराधिन होता.

(३) आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये रोजंदारी/तासिका तत्वावरील कार्यरत कर्मचा-यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत मा.उच्च न्यायालयांमध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांमध्ये दिलेल्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने सदर याचिकांमधील पात्र कर्मचारी तसेच मा.न्यायालयात याचिका दाखल न केलेल्या समानस्थित पात्र कर्मचारी यांना शासन सेवेत नियमित करण्यात आलेले आहे.

(४) व (५) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजनेंतर्गत नियुक्त मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांनी त्यांना शासन सेवेत नियमित करण्याच्या मागणीबाबत व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करण्याच्या आदेशाविरूद्ध न्यायालयात दावे दाखल केलेले असल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**वसई-विरार (जि.पालघर) येथील परीक्षेत्रात होणाऱ्या अवजड वाहतुकीवर नियंत्रण ठेवून अपघात रोखण्याबाबत**

**(८) २५६२ (२६-०४-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील परीक्षेत्रात खडी व दगड याची वाहतूक अवजड वाहनातून होत असून क्षमतेपेक्षाही अधिक प्रमाणात माल या वाहनामध्ये भरला जात असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूकदारांकडून नियमांची पायमल्ली करून क्षमतेपेक्षा अधिक दगड, वाळूमाती भरुन वाहतूक होत असून या वाहतुकीवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार अवजड वाहतुकीमुळे होत असलेले अपघात रोखण्यासह, अवजड वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२८-११-२०२५) :** (१) नाही.

(२) व (३) क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागाकडून नियमितपणे तपासणी करुन दोषी वाहनांवर कारवाई करण्यात येते.

वसई- विरार परिक्षेत्रात सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ मध्ये गौण खनिजांची वाहतूक करणारी एकूण ८१९ वाहने तपासण्यात आली असून त्यापैकी एकूण १०८ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून एकूण रुपये ३३.७२ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

पोलीस विभागाकडून देखील माहे जानेवारी, २०२५ या महिन्यात १२७ अवजड वाहनांवर कारवाई करण्यात येऊन त्यांचेकडून एकूण रुपये १.३० लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यात रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(९) २५६७ (०१-०५-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या गाव जोडो योजनेंतर्गत होणाऱ्या रस्त्यांना वन विभागामार्फत परवानगी देण्यात येत नसल्यामुळे उक्त योजनेतील रस्त्यांची कामे अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सर्वसामान्य जनतेची गैरसोय होऊ नये यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२०-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

नंदूरबार जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत गावजोडो योजनेंतर्गत कोणतेही कामे मंजूर नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्हा परिषदेमार्फत जलजीवन मिशन योजनेमध्ये झालेली अनियमितता व गैरव्यवहार**

**(१०) २५८२ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशन योजनेमध्ये झालेल्या अनियमितता व भ्रष्टाचार प्रकरणी मंत्रालयीन चौकशी समिती नेमून चौकशी करण्याची घोषणा मा.पाणीपुरवठा मंत्री यांनी विधिमंडळात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने उपरोक्त प्रकरणी संबंधीत दोषीवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०८-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी शासनस्तरावरुन सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशी शासनाने स्विकृत केलेल्या असून सदर शिफारशींच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याकरीता शासनाच्या दिनांक २६.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापुर, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या ३, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ६ व भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या १ अशा एकूण १० अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर अनियमितता केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग,

जिल्हा परिषद, बीड यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या ३ अधिकारी/ कर्मचारी यांना दिनांक ०३.०५.२०२४ रोजी ज्ञापन बजावण्यात येवून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. त्याअनुषंगाने सदर ३ अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी फेर चौकशी सुरु केलेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका क्र.११७५५/२०२४, ११८२७/२०२४ व १३०४/२०२४ दाखल केली होती. सदर याचिकेवरील दिनांक २०.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने फेर विभागीय चौकशी प्रकरणी ४ आठवडयात निर्णय देण्याबाबत जिल्हा परिषदेस आदेश दिले होते. त्याअनुषंगाने तत्का.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी विभागीय चौकशीची कारवाई स्थगित करुन फेर विभागीय चौकशी रद्द केल्याबाबत दिनांक १२.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त कर्मचाऱ्यांपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ६ अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द ज्ञापन बजावण्यात आले असून त्याअनुषंगाने विभागीय चौकशीबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच उपअभियंता (यांत्रिकी) यांच्यांवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना पाठविला असून भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा स्तरावर त्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील निगडी येथील कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या खाजगी ठेकेदाराच्या थकीत वीज देयकाबाबत

**(११) २५९५ (०१-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरात विविध ठिकाणी बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण निगडी येथे उभारलेल्या कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या मार्फत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निगडी येथील कमांड अँड कंट्रोल सेंटरचे खाजगी ठेकेदाराचे तीन महिन्याचे सुमारे ९२ लाखाचे विदयुत देयक महानगरपालिकेच्या वतीने भरण्यात आले होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुन्हा कमांड अँड कंट्रोल सेंटर यांच्या खाजगी ठेकेदाराचे ३० लक्ष रुपयांचे देयक थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर खाजगी ठेकेदाराचे मागील आणि आत्ताचे वीज देयके वसूल करण्याबाबत महानगरपालिकेच्या वतीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रशासक तथा आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका/स्मार्ट सिटी नियामक मंडळ यांचे मार्फत अंतिम निर्णय झाल्यानंतर पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी यांचेमार्फत सदर कंपनीच्या देयकातून वसूली करण्याची कार्यवाही करण्यातं येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महावितरणामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली उपकेंद्र कंत्राटी पद्धतीची निविदा रद्द करण्याबाबत

**(१२) २६०६ (२६-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणामध्ये वर्ग एक ते चार या प्रवर्गातील ३२ हजाराहून अधिक पदे रिक्त असल्याचे नुकतेच

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३२९ वीज उपकेंद्रांचे खाजगीकरण करून कंत्राटी पद्धतीने चालविण्यासाठी रु.५,९३५ कोटी इतक्या रकमेच्या निविदा महावितरणामार्फत प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी भरतीची प्रक्रिया संथगतीने सुरू असल्याने मंजूर पदांवर कंत्राटी पद्धतीने उपकेंद्र चालविणे, यंत्र चालकांची पदे भरण्यात येत असल्याच्या विरोधात महावितरणाच्या महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रिक वर्कर्स फेडरेशन व वीज कामगार, इंजिनीयर, तांत्रिक कामगार, वीज कामगार व इतर संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणाऱ्या पदांमुळे हजारो यंत्रचालकांच्या पदोन्नतीच्या मार्गात अडथळे निर्माण होणार असल्याने उपकेंद्र कंत्राटी पद्धती देण्याच्या निविदा रद्द करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही. सद्यस्थितीत महावितरण मध्ये वर्ग १ ते ४ या प्रवर्गातील २७,५१० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांच्या जागी २२,५२४ इतके बाहयस्त्रोत कर्मचारी कार्यरत असून सद्यस्थितीत ४,९८६ इतकी रिक्त पदे महावितरण जाहिरात क्र.०६/२०२३ अन्वये ५,३८६ विद्युत सहाय्यकांची पदे सरळ सेवा भरती द्वारे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे, अंशत: खरे आहे. राज्यातील ३२९ वीज उपकेंद्रांचे खाजगीकरण करण्यात येत नसून महावितरण कंपनीच्या अधिपत्याखाली निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून बाहयस्त्रोताव्दारे सदर उपकेंद्रांची संचालन, मनुष्यबळ, देखभाल, दुरूस्ती व इतर सुविधांसाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे या योजनेंअंतर्गत समाजमंदिर बांधकामाच्या रकमेत वाढ करणेबाबत

**(१३) २६४४ (२९-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे या योजनेतंर्गत समाजमंदिर बांधकामासाठी फक्त ७ लक्ष रुपयापर्यंत मंजुरीची मर्यादा अनुज्ञेय असून सदरील निधी कामासाठी अपुरा पडत असल्याने या निधीच्या मंजुरीच्या मर्यादेत २५ लक्ष पर्यंत वाढ करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश तत्कालीन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी प्रधान सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२५-११-२०२५) :** (१) होय,
(२) होय,
(३) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत समाज मंदिर बांधकामाच्या अनुदानात

वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) तालुक्यातील धान्य साठवणुकीसाठी नवीन गोदाम बांधण्याबाबत

**(१४) २६४६ (२८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील रास्तभाव दुकान व इतर योजनेच्या वितरणासाठी धान्य साठवणूक असलेले गोदाम (गोडाऊन) जुने झाले असून त्याचे छत खराब झाल्याने ते पावसाळयात गळत असल्यामुळे धान्याचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन गोदाम बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२४ मध्ये पालकमंत्री, लातूर व माहे जानेवारी, २०२५ मध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औसा व कासारशिरसी येथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेखाली वितरीत करण्यात येणाऱ्या साठवणुकीची धान्य क्षमता मासिक नियतनाच्या तीन पट करण्यासाठी नवीन गोदाम बांधकाम व अनुषंगिक आणि दुरुस्तीची कामे करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अंदाजपत्रकासह निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर केला हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०७-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
औसा (जि.लातूर) तालुक्यातील प्रश्नांकित धान्य साठवणूक गोदाम जुने झाले आहे. तथापि, पावसाळयात पावसामुळे धान्याचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) होय
(३) व (४) होय, विभागाच्या दिनांक १४.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये लातुर जिल्ह्यातील औसा तालुक्यामध्ये ३००० मे.टन क्षमतेच्या नवीन गोदाम बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मनोर (जि.पालघर) येथे आदिवासी समाजाची वारली हाटची कामे संथगतीने सुरु असल्याबाबत

**(१५) २६५१ (२६-०४-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मनोर (जि.पालघर) येथे आदिवासी समाजाची लोककला व संस्कृती जपण्यासाठी वारली हाटसाठी शासनाने ५७ कोटी ८५ लाखांच्या खर्चाला मान्यताही दिली असून आदिवासी विकास विभागाने ५० कोटींचा निधी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग करुनही नांदगाव येथे आदिवासी साहित्य पडून असल्याने अनेक वर्षांपासून काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारली हाटच्या देखरेखीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून वारली हाट विकास समितीमार्फत निविदेची कार्यवाही करुन रतन.जे. बाटलीबॉय कन्सल्टंट, मुंबई यांना या हाटच्या वास्तुविशारद पदी नियुक्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी समाजाची संस्कृती जपण्यासाठी व वारली हाटचे काम संथगतीने करणाऱ्या ठेकेदार व कंपनीवर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०९-१२-२०२५) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये Establishment of Warli Haat in Palghar हा प्रकल्प जनजातीय कार्य मंत्रालय,भारत सरकार यांच्याकडून मंजूर करण्यात आला होता. सदर प्रकल्पासाठी रक्कम रु.५७ कोटी ८५ लाखांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली होती. आदिवासी विकास विभागाकडून रु. ३६०५.७८७२२ लक्ष निधी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

कोवीड-१९च्या प्रादुर्भावामुळे कोवीड काळात काम बंद असल्यामुळे कामाची प्रगती काही प्रमाणात मंदावली होती त्यानंतर काम सुरळीत सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये Establishment of Warli Haat in Palghar या प्रकल्पासाठी जनजातीय कार्य मंत्रालय,भारत सरकार यांच्याकडून रु.२१.०० कोटी इतकाच निधी प्राप्त झाला होता. तथापि,सदर प्रकल्पासाठी शासनाकडून रु.१५.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून उर्वरित रु.२१.०० कोटी निधीची मागणी भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे करण्याचे विचाराधीन आहे. निधी अभावी व कोविडच्या प्रादुर्भावामुळे कामाचा वेग राखता आला नसला तरी सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम ९०% पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येत असलेले वांद्रे (पूर्व ) भारत नगर ते वाकोला जंक्शन पर्यतच्या उडडाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१६) २६५८ (०१-०५-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येत असलेले वांद्रे (पूर्व) भारत नगर ते वाकोला जंक्शन पर्यतच्या उडडाणपुलाचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे माहे जाने, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उडडाणपुल वाकोला जंक्शन येथील संरक्षण खात्याच्या जागेतून जात असल्यामुळे उडडाणपुलाचे काम करण्यास संरक्षण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागामार्फत जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया करण्यात येत असून संरक्षण खात्याच्या जमिनीचा मोबदला देऊन जमीन तातडीने अधिग्रहित करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, भारत नगर कडून येणारा सदरचा उडडाणपुल व हंस भुग्रा मार्गावरील उन्नत मार्ग यांचा वाकोला जंक्शन येथे मिलाप होत असून हा मार्ग अरुंद असल्याने त्याठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतूक कोडी सोडविण्याच्या दृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सांताक्रुझ कुर्ला जोडरस्त्यावरील रस्ता रुंदीकरण मार्गावर वाकोला जंक्शन येथे संरक्षण विभागाची जागा येत असल्याने उड्डाणपुलाचे काम रखडले होते. संरक्षण विभागाने दिनांक २७.११.२०२४ च्या पत्रान्वये सदर उड्डाणपुलाचे काम करण्यास तत्वत: मंजूरी दिली आहे. त्यानुसार बाधित होत असलेल्या रस्त्याकरीता जागेची भुसंपादन प्रक्रिया करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व संरक्षण विभागाच्या प्रतिनिधीच्या

उपस्थितीत मोजणी पूर्ण करण्यात आली असून मुंबई महानगरपालिकेकडून बाधित जमिनीची मोबदला रक्कमेबाबतचा अहवाल नगरभूमापन विभागाकडून प्राप्त होताच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भूंसपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल व सदर भागात प्रकल्पाचे उर्वरित काम प्राधिकरणामार्फत सुरु करण्याचे नियोजित आहे.

(४) व (५) सांताक्रुज चेंबुर जोडरस्त्यामधील चेंबुर कडून येणारा उड्डाणपूल वाकोला नाल्यावरील पुलाच्या आधी उतरविण्यात आलेला असून वाकोला नाला पूलाचे रुंदीकरणाचे काम हे संरक्षण विभागाच्या अखत्यातील भूसंपादन न झाल्याने रुंदीकरण करणे शक्य झाले नाही. त्यामुळे वाकोला नाल्यावरील अरुंद पुलामुळे काही प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. तथापि बाधित जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया बृन्हमुंबई महानगरपालिकेकडून अंतिम टप्यात असून सदर प्रकिया पुर्ण होताच पुलाच्या रुंदीकरणाचे काम हाती घेवून तातडीने प्राधिकरणामार्फत पुर्ण करण्यात येईल. त्यामुळे सदर भागातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

---

## विमानतळ प्राधिकरणाच्या अंतर्गत फनल झोनच्या लगत असलेल्या इमारतीचा पुनर्विकास प्रलंबीत असल्याबाबत

**(१७) २६६० (०१-०५-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमानतळ प्राधिकरणाच्या अंतर्गत फनल झोनच्या लगत असलेल्या इमारतीचा विकास एव्हिएशन विभागाने इमारतीच्या उंचीवर निर्बध घातल्याने प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विमानतळ रनवे फनेलमुळे पुनर्विकासाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाकोला सांताक्रुझ, विलेपार्ले व कुर्ला विभागातील अनेक इमारती धोकादायक झालेल्या असून कोणत्याही क्षणी कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इमारतीच्या उंचीवर निर्बध असल्याने इमारतीच्या विकासाबाबत व रहिवाश्यांच्या सुरक्षिततेबाबत सर्वंकष धोरण आखण्याबाबतचा प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१), (२) व (३) मुंबई मधील विमानतळ लगतचा परिसर भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार फ़नेल झोनमध्ये येतो. सदर फ़नेल झोनमध्ये विमानांच्या दळणवळणाकरिता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणामार्फत प्रत्येक इमारती ची कमाल उंची ठरविण्यात येते. त्यामुळे, मुंबईमधील सांताक्रूझ, पार्ले व कुर्ला या भागात विमानतळाच्या फनेल झोनमुळे इमारतींच्या उंचीवर मर्यादा आहे. त्यामुळे इमारतींचे बांधकाम अथवा पुनर्विकास, या फनेल झोनच्या नियमांतर्गत त्या त्या ठिकाणी जेवढी उंची अनुज्ञेय असेल तेवढ्याच उंचीपर्यंत करता येतो. सदरहू क्षेत्रातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुदीनुसार परवानगी योग्य संपुर्ण क्षेत्राचा वापर करून पुर्ण क्षमतेने पुनर्विकास करणे शक्य होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(४) व (५) बृहन्मुंबई क्षेत्रातील उंचीचे निर्बंध असलेल्या एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये त्याबाबत स्वतंत्र तरतूद करण्याकरिता शासनाने मान्यता दिली असून त्यानुसार उक्त नियमावलीचे विनियम ३३ मध्ये खंड २६ अन्वये नव्याने स्वतंत्र तरतूद अंतर्भूत करणेबाबत उक्त नियमावलीमध्ये फेरबदल करणेकरीता शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१कक) अन्वयेची दिनांक २८/०३/२०२५ रोजीची फेरबदलाची सूचना निर्गमित केली असून सदर प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने पुढील वैधानिक कर्यवाही पुर्ण करणेकरिता उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांची 'अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार, नियुक्त अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांनी सदर फेरबदलानुषंगाने वैधानिक कार्यवाही करून दिनांक ०१/०७/२०२५ व दिनांक १८/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये नगर रचना संचालनालयामार्फत अहवाल शासन नगर विकास विभागास सादर केला आहे. त्यानुषंगाने संचालक,

नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर फेरबदलाचे मंजूरीचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

---

**श्रीरामपूर (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील महावितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्ताव**

**(१८) २७२० (२६-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील महावितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाने ग्राहक संख्येनुसार अतिरिक्त लाईन स्टाफ मिळण्यासाठी MANPOWER REVIEW २९ नुसार प्रस्ताव पाठवला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कंपनीची नवीन कार्यालय निर्मितीची कर्मचारी मानंके/ ग्राहक मानंके पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु असून सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर वरील प्रस्तावासंदर्भात कंपनीची आर्थिक परिस्थिती व आर्थिंक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वीज चोरी रोखण्यासाठी नियमावली तयार करण्याबाबत**

**(१९) २७२८ (२७-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असून अनेक नवनवीन सुधारणा करत आहे तसेच याचाच भाग म्हणून उर्जा विभागाने पारंपारिक पद्धतीने वीज निर्मिती बरोबरच सौर उर्जा बाबत स्वयंपूर्ण होणेबाबत पाऊले उचलली असून, वीज गळती रोखण्यासाठी अनेक प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरी आणि ग्रामीण भागातील काही नागरिक विद्युत वाहक तारांवर आकडे टाकून वीज चोरी करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांचेवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आल्यानंतर देखील आकडे टाकून वीज चोरी करणे बंद झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने वीज चोरी रोखण्यासाठी अनेक ठिकाणच्या जुन्या तारा बदलून त्याऐवजी नवीन एरियल ब्रॅण्ड केबल बसविण्याचे काम हाती घेतलेले असून, या एरियल ब्रॅण्डच्या केबल अनेक ठिकाणी वाईट प्रवृत्तीच्या नागरिकांमार्फत केबल कुडतडणे, आकडे टाकणेसाठी केबल खराब करणे असे अनेक प्रकार घडत असल्याने अशा वाईट प्रवृत्तीच्या नागरिकांमध्ये कायद्याविषयी भीती राहिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने रेल्वे विभागाच्या नियमानुसार कठोर अशी नियमावली तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

सौर उर्जेसाठी स्वयंपूर्ण होणेसाठी प्रधानमंत्री कुसुम 'अ', प्रधानमंत्री कुसुम 'क' व मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०, उपसा जलसिंचन योजनांचे सौर उर्जीकरण, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, सौरग्राम योजना

प्रभाविपणे राबविण्यात येत आहेत. वीज गळती रोखण्यासाठी व वीज चोरीवर आळा घालण्यासाठी महावितरण सतत प्रयत्न करीत आहे.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

वीजचोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने व त्या अनुषंगाने वीज गळती रोखणेसाठी महावितरणतर्फे विद्युत वाहक तारांवर आकडे टाकून वीजचोरी करत असलेल्या वापरकर्त्यावर भरारी पथकांद्वारे वीज अधिनियम २००३ चे कलम १३५ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, त्यापोटी रु.४.६७ कोटी एवढया रक्कमेचे निर्धारण करण्यात आले आहे. अशाप्रकारे (सु.व अ.) विभागातर्फे करण्यात आलेल्या कारवाईमध्ये २.०६ दशलक्ष युनिटची वीज चोरी उघडकीस येवून त्यापोटी रु. ३०१.७८ लाख एवढया रकमेची वसुली करण्यात आली आहे. त्याचबरोबर अशाप्रकारे वीज चोरी उघडकीस आलेल्या १०६ प्रकरणांमध्ये पोलीस स्टेशनमध्ये रीतसर गुन्हे नोंदविण्यात आले असून पोलिस प्रशासनामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

नागरिकांमार्फत एरियल बंच्ड केबल कुरतडणे, आकडे टाकणेसाठी केबल खराब करणे असे प्रकार घडत असल्याबदृल या कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकाच घटनेमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी शवविच्छेदन अहवाल वेगवगळे येत असल्याबाबत**

**(२०) २७४२ (२८-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकाच घटनेमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी शवविच्छेदन केले असता अनेकदा शवविच्छेदन अहवाल वेगवेगळे येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीगोंदा (जि.अहिल्यानगर) येथील ग्रामीण रुग्णालयात मृत व्यक्तीचा शवविच्छेदन अहवालावर जर शंका उपस्थित झाली आणि त्याच मृत व्यक्तीचा शवविच्छेदन जिल्हा रुग्णालय त्यानंतर ससून रुग्णालय, पुणे येथे केले असता सदर अहवाल अनेकवेळा परस्पर विरोधी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ससून रुग्णालयात केलेल्या शवविच्छेदन अहवालामध्ये अनेकदा तांत्रिक चुका या संशय निर्माण करणाऱ्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-१०-२०२५) :** (१), (२) व (३) सामान्यत: काही न्यायवैद्यक प्रकरणांत नातेवाईक वा पोलीस तपासी अधिकारी प्राथमिक शवविच्छेदन अहवालातील मृत्युच्या कारणाबाबत असमाधानी असल्याने दुबार शवविच्छेदनाची मागणी करतात. ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे अशी प्रकरणे क्वचितच झाली असून काही ठिकाणी प्राथमिक व दुबार शवविच्छेदन अहवालांमध्ये तफावत आढळली आहे. मात्र, एकाच मृतदेहावर प्रथम श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालय त्यानंतर जिल्हा रुग्णालय, आणि नंतर ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे अनुक्रमे शवविच्छेदन झाल्याची कोणतीही नोंद उपलब्ध नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ अनुदान मिळणेबाबत**

**(२१) २७८२ (०५-०५-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशत: व विनाअनुदानित ३ हजार शाळा, १५ हजार तुकडयांना वाढीव २० टक्क्यांचे टप्पा अनुदान अद्यापर्यंत मिळाले नसल्याने तब्बल ५१ हजारांवर शिक्षकांना वेतनवाढ मिळाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टप्पा अनुदान मंजूर करणे व अन्य मागण्यांसाठी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार २० टक्के, ४० टक्के, ६० टक्के व ८० टक्के या वाढीव पात्र शाळा व तुकडयांना टप्पा वाढ अनुदान देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) टप्पा अनुदान मंजूर करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १४.१०.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला होता. शासन निर्णय दिनांक २५.०८.२०२५ अन्वये, अनुदान टप्पावाढ करण्यासंदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेला दिनांक १४.१०.२०२४ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आला असून दिनांक २५.०८.२०२५ रोजीच्या सुधारित शासन निर्णयान्वये, राज्यातील खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा / तुकड्या व त्यावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना टप्पा अनुदान मंजूर करण्यास मान्यता दिली असून अनुदान वितरणाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अधिकारी, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२२) २८३२ (२८-०४-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या २७४ शाळांपैकी १०४ शाळांमध्ये अधिकारी, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकाऱ्यांची ७० टक्के पदे रिक्त असल्याने जिल्हा परिषद शाळांचा बोजवारा उडाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तेवर आणि पटसंख्येवर परिणाम होत असल्याने उपरोक्त रिक्त पदे तात्काळ भरून सर्व शाळांचा आढावा घेण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विभागाच्या दिनांक २४.०९.२०२५ व दिनांक ०४.११.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपशिक्षणाधिकारी व

तत्सम संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच, सदर संवर्गातील सरळसेवेची व पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महावितरण विभागांतर्गत उपकेंद्र अधिसंख्य पदावर नियुक्तीकरीता मंजूर अधिसंख्य पदाच्या रिक्त राहिलेल्या जागेवर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत**

**(२३) २८४५ (२७-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण विभागांतर्गत ०५/२०१९ नुसार उपकेंद्र अधिसंख्य पदावर नियुक्तीकरीता मंजूर अधिसंख्य पदाच्या रिक्त राहिलेल्या जागेवर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे. "उपकेंद्र सहायक" पदाच्या जाहीरात क्र. ०५/२०१९ मधील एस.ई.बी.सी. प्रवर्गातील पात्र २७९ उमेदवारांसाठी २७९ अधिसंख्य पदे निर्माण केली होती. सदर अधिसंख्य उमेदवारांपैकी कागदपत्रे पडताळणीअंती गैरहजर/अपात्र उमेदवारांच्या जागी प्रतिक्षा यादीतील २६ उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देणेबाबत निवेदन प्राप्त झाले होते.
(२) महावितरण सेवाप्रवेश जाहिरात क्र.०५/२०१९ मधील "उपकेंद्र सहायक" पदाकरीता एस.ई.बी.सी. प्रवर्गातील २७९ अधिसंख्य केलेल्या उमेदवारांपैकी कागदपत्रे पडताळणीअंती अपात्र/गैरहजर अशा २६ उमेदवारांची अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव महावितरण कंपनीचे पत्र दिनांक २०.०२.२०२४ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाकडून अभिप्राय प्राप्त करुन उपकेंद्र सहायक संवर्गातील प्रतिक्षा यादी वरील उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्तावावर विचार करणे संयुक्त ठरणार नाही असे शासनाने दिनांक ०५.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये महावितरण कंपनीस कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे चिंचोली (सायकन) (ता.निलंगा, जि.लातूर) येथील घरावरून व जि.प.शाळेवरून गेलेली विद्युत लाईन व रोहित्र स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२४) २८४७ (२७-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चिंचोली (सायकन) (ता.निलंगा, जि.लातूर) येथील घरावरून व जि.प.शाळेवरून गेलेली विद्युत लाईन व रोहित्र स्थलांतरीत करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग, निलंगा यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू विद्युत लाईन व रोहित्र स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे,
(२) मौ. चिंचोली (सायकन), ता. निलंगा, जि. लातूर येथील घरावरुन व जि.प. शाळेवर असलेली विद्युत लाईन व रोहीत्र

स्थलांतरीत करण्याच्या अनुषंगाने शाखा अभियंता व उपकार्यकारी अभियंता यांनी स्थळ तपासणी केली असता असे आढळून आले की, ११ के. व्ही चांदोरी विद्युत वाहिनीची उभारणी महावितरण कंपनीद्वारे पुर्वीपासून करण्यात आलेली आहे. तथापि, जि. प. शाळा व इतर ०९ घरांचे बांधकाम हे ११ के.व्ही. वीज वाहिनी उभारणीचे काम पूर्ण झाल्यानंतरच्या काळात महावितरण कंपनीला कोणतीही पूर्वसूचना व परवानगी न घेता करण्यात आले आहे.

तथापि, मानवी सुरक्षेच्या दृष्टीने व स्थानिक लोकप्रितिनिधी यांच्या मागणीनुसार सदरील विद्युत वाहिनी स्थलांतर करण्याच्या अंदाजपत्रकास जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी) ND-SI योजनेत प्रणाली सुधारणा अंतर्गत मान्यता देऊन सदर वाहिनी स्थलांतरीत करण्याचे काम दिनांक २०.०६.२०२५ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत

**(२५) २८५६ (२६-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासनाच्या विभागाद्वारे निर्गमित परिपत्रके / निर्णय महावितरण विभागास लागू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाच्या धर्तीवर नमूद शासन निर्णयात वर्णन केलेल्या कार्यपध्दतीनुसार ज्या कर्मचाऱ्यांविरुध्द न्यायप्रकरणे प्रलंबित आहेत अशा कर्मचाऱ्यांविरुध्द महावितरण सेवा शर्ती, वेळोवेळी निर्गमित झालेली परिपत्रके व सेवाप्रवेश वर्गीकरण विनियमातील विविध तरतूदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुहाघर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कुंडली नं.२ येथे कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू झालेल्या कर्मचा-यांना विमा कवच / सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याबाबत

**(२६) २८६४ (०५-०५-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहाघर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कुंडली नं.२, या शाळेत कोविड-१९ संबंधीत कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू झालेल्या सहाय्यक शिक्षकास विमा कवच / सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०१-१०-२०२५) :** (१) व (२) गुहाघर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कुंडली नं. २ या शाळेतील कै (श्री.) अनिल संजय कुंभार, शिक्षण सेवक, यांचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव शासन ज्ञापन

क्र.सहाय्य-२०२५/प्र.क्र.१७/टीएनटी-६ दिनांक २७/०६/२०२५ अन्वये मंजुर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मजरेवाडी येथील कृष्णा योजनेच्या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२७) २८६५ (०१-०५-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मजरेवाडी येथील कृष्णा योजनेच्या जलवाहिनी बदलण्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने नागरिकांना पाण्याच्या तीव्र समस्या जाणवत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेकडे वारंवार बैठका घेऊनही कामाची गती अद्याप वाढविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार मजरेवाडी येथील कृष्णा योजनेच्या जलवाहिनीचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२५) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत इचलकरंजी शहरातील मजरेवाडी उद्धव योजनेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या जवळपास १८ किमी पाईपलाईनपैकी ६.२३५ किमी पाईपलाईन बदलण्याच्या कामाच्या प्रकल्पास दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. सदर प्रकल्पातील प्रस्तावित ६.२३५ किमी पैकी ५.९८४ किमी पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून उर्वरित २५१ मीटर पाईपलाईन खरेदी करण्याची कार्यवाही कंत्राटदारामार्फत सुरू असून ५.९८४ किमी पाईपलाईनमुळे यापूर्वी वारंवार होणाऱ्या गळतीचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी झाले आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत इचलकरंजी शहरातील मजरेवाडी उद्धव योजनेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अद्याप यापूर्वी न बदलण्यात आलेल्या उर्वरित पाईपलाईनपैकी ५.५० किमी पाईपलाईन व मजरेवाडी जॅकवेल येथे ५४० अश्वशक्ती क्षमतेचे दोन पंप बसविण्याच्या कामाच्या प्रकल्पास दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पातील एकूण ५.५० किमी पाईपलाईन पैकी ३.९० किमी पाईपलाईन टाकण्याचे काम कंत्राटदारामार्फत पूर्ण करण्यात आले असून उर्वरित १.६० किमी पाईप टाकणे व ५४० अश्वशक्ती क्षमतेचे दोन पंप बसविण्याचे काम बाकी असून उर्वरित काम फेब्रुवारी, २०२५ अखेर पूर्ण करणेबाबत मक्तेदारास महानगरपालिकेमार्फत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

इचलकरंजी शहरातील नागरिकांना पाणी प्रश्नाच्या अनुषंगाने मनपामार्फत ८० विंधन विहिरीमधून पाण्याची उपलब्धता करून दिलेली आहे. तसेच, पंचगंगा व कृष्णा उद्धवावरुन पाण्याच्या उपलब्धतेनुसार शहरास इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) नगरोत्थान महाभियानांतर्गत इचलकरंजी शहरातील मजरेवाडी उद्धव योजनेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अद्याप यापूर्वी न बदलण्यात आलेल्या उर्वरित पाईपलाईनच्या प्रकल्पातील कामात मार्गावरील झाडांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होत असलेला विलंब तसेच, स्थानिक ग्रामस्थ यांचा विरोध, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकडून पाठ्यपुराव्यास होत असलेला विलंब व विद्युत वाहिनी स्थलांतरित करणेकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी यांचेकडून सुरू असलेले काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत प्रकल्पाच्या प्रगतीच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा बैठकी घेण्यात आल्या असून यामध्ये कंत्राटदारास कामाची आवश्यक गती वाढविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र

कंत्राटदारामार्फत आवश्यक ती गती प्राप्त झालेली नसून सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने करारातील मुदत संपल्यानंतर कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित असल्याचे इचलकरंजी महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अंतर्गत संभाजीनगर परिमंडळाचे विभाजन करून महापारेषणचे लातूर परिमंडळ स्थापन करणेबाबत**

**(२८) २८७५ (२६-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अंतर्गत संभाजीनगर परिमंडळाचे विभाजन करून महापारेषणचे लातूर परिमंडळ स्थापन करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी अतिरिक्त मुख्य सचिव (ऊर्जा) विभाग यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

मा. विधानसभा सदस्य यांचे सम विषयांचे क्र.३३७६/०३/२०२३ दिनांक ०४.०३.२०२३ रोजीचे तत्कालीन उप मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन यांना अग्रेषित निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले होते. परंतु मा. विधानसभा सदस्य यांचे दिनांक २०.०१.२०२५ चे निवेदन या कार्यालयास अद्याप प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर परिमंडळ कार्यालयात मराठवाडयातील ०८ जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, लातूर, नांदेड व उस्मानाबाद हे जिल्हे येतात. तसेच छत्रपती संभाजीनगर परिमंडलांतर्गत ०८ जिल्हे मिळून १०२ उपकेंद्रे आहेत व परिमंडलातांतर्गत एकूण २४४५ विविध संवर्गाची मंजूर पदे आहेत.

छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे विभाजन करणेबात २०१५ पासून मागणी होत होती. सदर प्रकरणी महापारेषण कंपनीने वरिष्ठ स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेतला होता. सन २०२३ मध्ये तत्कालीन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मुख्य अभियंता, छत्रपती संभाजीनगर यांचेसमवेत दिनांक २८.०२.२०२३ रोजी दृश्यश्राव्य (Video Conference) पध्दतीने बैठक घेतली होती. चर्चेअंती छत्रपती संभाजीनगर परिमंडळाची सद्य:स्थितीतील रचना योग्य असल्याने व परिमंडळाचे विभाजन करुन नवीन परिमंडळ स्थापन केल्यास कंपनीवर अतिरिक्त आर्थिक भार येणार असल्याने सद्य:स्थितीतील छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे विभाजन न करण्याबाबत निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील अध्यक्ष व सचिव ही पदे भरण्याबाबत**

**(२९) २८८४ (२४-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील कायमस्वरूपी व पूर्णवेळ अध्यक्ष व सचिव ही दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे सुरक्षा रक्षकांचे प्रश्न सोडविण्यास अडचणी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयात साधारणत: १८०० ते २००० छोटे मोठे उद्योगधंदे व इतर काही आस्थापना असून जिल्ह्यामध्ये एकूण २३२७ सुरक्षा रक्षक तैनात असून २५८२ सुरक्षा रक्षक प्रतिक्षा यादीमध्ये आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्हयातील सुरक्षा मंडळात अध्यक्ष व सचिव ही पदे अनेक महिन्यांपासून रिक्त असल्यामुळे सुरक्षा रक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने अध्यक्ष व सचिव ही दोन्ही पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१०-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळावर अध्यक्ष व सचिव या पदाचा अनुक्रमे कामगार उप आयुक्त आणि सरकारी कामगार अधिकारी या दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला असून, या पदावर सदरहू अधिकारी कार्यरत असून मंडळामध्ये प्राप्त होणारे अर्ज व तक्रारी यांच्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही मंडळस्तरावर करण्यात येते.
सदर मंडळामध्ये २३२७ सुरक्षा रक्षक कार्यरत असून, एकूण २५८२ सुरक्षा रक्षक प्रतिक्षा यादीवर आहेत.
सुरक्षा रक्षकांचे प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने मंडळाकडून प्रयत्न करण्यात येत असून प्रतिक्षेतील सुरक्षा रक्षकांना नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई वाहतूक विभागातील वाहतूक पोलीस बदलीच्या ठिकाणी हजर न झाल्याबाबत

**(३०) २९०३ (२५-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत वाहतूक विभागात जवळपास पाच हजारांवर पोलीस कार्यरत आहेत यातील ४८ डिव्हिजन मधील सरासरी प्रत्येकी १२ ते १४ पोलिसांच्या बदल्या २०२३-२४ मध्ये झालेल्या असून, यामध्ये बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दलात बदली झालेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई यांना अजूनही बदली झालेल्या ठिकाणी सोडण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तर दुसरीकडे अनेक अंमलदार हे एकाच ठिकाणी सुमारे सहा ते सात वर्षे कार्यरत असल्याची बाब समोर आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दक्षिण वाहतूक विभागातील आझाद मैदान कुलाबा मरीन ड्राईव्ह डीबी मार्गे जास्त तणावाच्या डिव्हिजन मधील सुमारे १२ अंमलदारांना अद्यापही बदलीच्या ठिकाणी सोडण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाचशेहून अधिक वाहतूक पोलिसांची बदली होऊनही ते बदली झालेल्या ठिकाणी हजर झालेली नसल्याने सदरहू प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२), (३) व (४) मुंबई वाहतूक शाखेत एकूण ४१ वाहतूक विभाग आहेत. दक्षिण वाहतूक विभागातील आझाद मैदान, कुलाबा, मरीन ड्राईव्ह, डी. बी. मार्ग विभागातून पोलीस ठाणे, शाखा, विभाग येथून आहे हे दर्शविण्यात आलेल्या एकूण ६५ पोलीस अंमलदारांच्या बदल्या दर्शविण्यात आल्या असून, सर्व पोलीस अंमलदार यांना वाहतूक विभागामधून कार्यमुक्त करण्यात आले आहे. सर्वसाधारण बदली - २०२३ मध्ये वाहतुक शाखेतून एकूण ४२७ पोलीस अंमलदार यांच्या अन्य ठिकाणी दर्शविण्यात आल्या असून, त्या सर्वांना बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच,

पोलीस ठाणे, शाखा विभाग येथून हे ही वाहतूक विभागामध्ये एकूण ५३३ पोलीस अंमलदार यांच्या बदल्या दर्शविण्यात आले असून, त्यापैकी अद्यापि, ४ पोलीस अंमलदार वाहतूक शाखेत हजर झालेले नाहीत.

सर्वसाधारण बदली - २०२४ मध्ये वाहतुक शाखेतून एकूण ६१६ पोलीस अंमलदारांच्या अन्य ठिकाणी बदल्या दर्शविण्यात आल्या आहेत. त्यापैकी, एकूण ५७७ पोलीस अंमलदारांना कार्यमुक्त करण्यात आले असून, २९ अंमलदारांच्या बदलीस स्थगिती मिळाली आहे. तर, ८ अंमलदारांच्या बदल्या रद्द झाल्या आहेत. उर्वरीत २ पैकी १ अंमलदार हे नजिकच्या कालावधीत सेवानिवृत्त होत आहेत व १ अंमलदार यांना वैद्यकीय कारणास्तव कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच, पोलीस ठाणे, शाखा विभाग येथून वाहतूक विभागामध्ये एकूण ११२६ पोलीस अंमलदार यांच्या बदल्या दर्शविण्यात आल्या असून, त्यापैकी १०५९ पोलीस अंमलदार वाहतूक शाखेत हजर झाले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील शेअर रिक्षा चालकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्याबाबत

**(३१) २९०८ (२५-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाहतुकीच्या नियमावलीनुसार रिक्षामध्ये तीन पेक्षा जास्त प्रवासी घेतले जाऊ शकत नाही आणि घेतल्यास हा दंडनीय अपराध मानला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सायन पासून मुलुंड पर्यंत आणि वांद्रे पासून दहिसर पर्यंतच्या रेल्वे स्थानकाबाहेर शेअर रिक्षा चालकाकडून वाहतुकीचे सगळे नियम मोडून रिक्षा चालक हमखास चौथी सीट घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुर्ला, घाटकोपर पूर्व, विद्याविहार पूर्व पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेर वाहतूक नियम सर्रास मोडले जात असून काही वेळेला रिक्षात पाच प्रवासी बसवले जातात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन रिक्षाचालकांमध्ये नियम रुजू करण्यासाठी व नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०५-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व), मुंबई (पश्चिम) व बोरीवली या कार्यालयाच्या वायुवेग पथकांद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करुन विहित मर्यादेपेक्षा जादा प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करुन कारवाई करण्यात येते. वाहतूक नियमांचे उल्लंघन करीत असलेल्या ऑटोरिक्षा वाहनांची तपासणी करुन कारवाई करण्याकरिता वाहतूक पोलीस विभाग व परिवहन विभागामार्फत संयुक्त तपासणी मोहिम राबविण्यात आली आहे.
वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ऑटोरिक्षा चालकांवर केलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| कार्यालयाचे नाव | कालावधी | दोषी वाहने | तडजोड शुल्क वसूली (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| प्रापका, मुंबई (पश्चिम) | एप्रिल २०२४ ते मे २०२५ | ३०४१ | ३६.५७ |
| प्रापका, मुंबई (पूर्व) | एप्रिल २०२४ ते मे २०२५ | ४५५० | ६३.१० |
| प्रापका, बोरीवली | एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५ | ८७४ | १४.०१ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रस्त्यावर विनापरवाना खाद्यपदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३२) २९१४ (२८-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्नपदार्थ विक्रेते किंवा उत्पादकांना अन्नसुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत परवाना नोंदणी घेऊनच व्यवसाय करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारा लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यवसायिकांच्या नोंदणीसाठी फक्त शंभर रुपये खर्च येतो तर बारा लाखापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या अन्न विक्रेत्यांना २००० तर उत्पादकांना तीन ते पाच हजार रुपयात खाद्यपदार्थ परवाना दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनापरवाना अन्नपदार्थ विकणाऱ्यांना दोन लाखापर्यंतचा दंड व सहा महिन्यांचा कारावास होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईत बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर समोसे, वडापाव आदी खाद्यपदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात केली जात असून यापैकी बहुतेक विक्रेत्यांकडे परवाना नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रस्त्यावर विनापरवाना खाद्यपदार्थ विकणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (१६-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) परवानापात्र अन्न व्यावसायिक हा विनापरवाना अन्न व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्यास अन्न सुरक्षा व मानके, २००६ चे कलम ६३ नुसार रुपये दहा लाखापर्यंत दंडाची तरतूद आहे. तसेच, नोंदणीपात्र अन्न व्यावसायिक हा विनानोंदणी अन्न व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्यास अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ६९ नुसार तडजोडची कारवाई करून रुपये एक लाखापर्यंत तडजोड शुल्क आकारले जाते.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

मुंबईमध्ये बहुतांश रस्त्यावर अन्न व्यवसाय करणा-या अन्न व्यावसायिकांनी परवाना/नोंदणी घेतलेली आहे. तथापि, अन्न व औषध प्रशासनाने एप्रिल २०२४ ते २८ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत केलेल्या तपासणीत रस्त्यावर समोसे, वडापाव इत्यादी खाद्यपदार्थाची विक्री करणाऱ्यापैकी १५ आस्थापना विनानोंदणी अन्न व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे, संबंधित आस्थापनाविरुध्द तडजोड अर्ज दाखल करून एकूण रु.२,५५,०००/- इतका दंड त्यांचेकडून वसूल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांसाठी मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेले कर्मचारी आपल्या मूळ विभागात परतले नसल्याबाबत**

**(३३) २९६५ (०१-०५-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांसाठी मुंबई महानगरपालिकेने सुमारे ६० हजार कर्मचारी निवडणूक कामासाठी नियुक्ती केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार महानगरपालिकेने तगादा लावल्यानंतरही हे कर्मचारी महानगरपालिकेत आपल्या मुख्य नियुक्तीवर परतले असले तरी अद्याप ५८६ कर्मचारी परतले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निवडणूकीच्या कामांकरीता नियुक्ती करण्यात आलेले कर्मचारी हे प्रतिनियुक्तीवर नसल्याने या ५८६

कर्मचा-यांना मूळ विभागात परतणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापही हे कर्मचारी परतले नसण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, तात्काळ या कर्मचाऱ्यांना मूळ विभागात हजर करून घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, या कर्मचा-यांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार २४९४० कर्मचारी निवडणूक कामासाठी नियुक्त केले होते.
(२) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ११४ कर्मचारी अद्याप परतलेले नाहीत.
(३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ११४ कर्मचारी परतणे अपेक्षित आहे.
(४) जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी मुंबई शहर व मुंबई उपनगर कार्यालयाशी संबंधित आहे.
(५) निवडणूक निर्णय अधिकारी १५२ ते १८७ विधानसभा मतदारसंघ यांना क्र. ओएसडी/१४० दिनांक ०२.१२.२०२४ अन्वये महानगरपालिकेचे निवडणूक कर्तव्यार्थ सेवा अधिग्रहित करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यालयात परत पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.
(६) ३ कर्मचाऱ्यांवर वेतन रोखण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

---

## राज्यातील वाहन चालकांवर लावलेल्या थकीत दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत

**(३४) २९७५ (२७-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबईमध्ये वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्यावर ई-चलनाच्या माध्यमातून दंड वसूल केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२२ -२०२३ व २०२३-२०२४ या वर्षात किती दंड वसूल केला व त्यातील किती रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकीत दंड वसूल करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०७-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य, पश्चिम, पूर्व) व बोरीवली कार्यालयाद्वारे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या कालावधीत खालीलप्रमाणे ई-चलान जारी करुन तडजोड शुल्क वसुल करण्यात आले आहे.

| कार्यालयाचे नाव | कालावधी | एकूण चलान संख्या | तडजोड शुल्क<br>(रु. लाखात) |
|---|---|---|---|
| प्रा.प.का., मुंबई (मध्य) | सन २०२२-२३ | ९४७४ | ६२९.३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.प.का., मुंबई (मध्य) | सन २०२३-२४ | ८२४४ | ५२१.४३ |
| प्रा.प.का., मुंबई (पश्चिम) | सन २०२२-२३ | ७४४१ | ६०३.६८ |
| प्रा.प.का., मुंबई (पश्चिम) | सन २०२३-२४ | ९५८१ | ६३७.९३ |
| प्रा.प.का., मुंबई (पूर्व) | सन २०२२-२३ | १७६७२ | ४३२.२२ |
| प्रा.प.का., मुंबई (पूर्व) | सन २०२३-२४ | १५२३६ | ३७१.२८ |
| प्रा.प.का., बोरीवली | सन २०२२-२३ | ३४२३ | ५२.५२ |
| प्रा.प.का., बोरीवली | सन २०२३-२४ | ३५७० | ३५.८६ |

राज्यातील वाहन चालकांवर लावलेल्या दंडाची थकीत रक्कम वसुल करण्यासंदर्भात पोलीस उप आयुक्त (मुख्यालय व मध्य विभाग) वाहतुक, मुंबई यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

| अ.क्र. | कालावधी | एकूण वसुल करण्यात आलेला दंड (रुपये) |
|---|---|---|
| १. | १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ | १७०,८०,५३,८५० |
| २. | १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ | २३४,०७,२७,३५० |
| एकूण | ४०४,८७,८१,२०० | |

(३) वाहनांचा प्रलंबित दंड वसुल करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-
वायुवेग पथकामार्फत तपासणीमध्ये दोषी आढळणाऱ्या वाहनांस ई-चलान जारी केल्यानंतर वाहनमालकांना जागेवरच दंडाचा भरणा करण्याची सोय ई-चलान मशीनमध्ये अद्यावत आहे.

ई-चलान मशीनद्वारे चलान जारी झाल्याबाबतचा संदेश वाहनमालकांच्या भ्रमणध्वनीवर प्राप्त होतो.

प्रलंबित दंडाबाबतची प्रकरणे मा. न्यायालयात दाखल करण्यात येत आहेत.

प्रलंबित प्रकरणातील वाहन काळ्या यादीत टाकण्यात येत आहे.

प्रलंबित दंड असलेल्या वाहन मालक / चालक यांना दंड भरण्याबाबत नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे.

दर तीन महिन्यांनी मुंबई शहरातील विविध न्यायालयांमध्ये लोक अदालत आयोजित करुन वाहनांवरील दंडाची तडजोड रकमेचा भरणा प्रलंबित ठेवणाऱ्या कसुरदार वाहन धारकांची प्रकरणे लोक अदालती मध्ये मा. न्यायालयासमोर ठेवण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय रुग्णालयात औषध पुरवठा बंद असल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(३५) २९७६ (३०-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयात थकीत रक्कमेमुळे स्थानिक औषध विक्रेत्यांनी औषध पुरवठा बंद केला असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या कारणास्तव शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०९-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील विविध मैदानांवर करण्यात आलेले अतिक्रमण दूर करण्यासह त्याठिकाणी सुरू असलेले अवैध धंदे बंद करण्याबाबत**

**(३६) २९९० (०१-०५-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढत्या शहरीकरणामुळे एकीकडे मैदाने शिल्लक नसताना, दुसरीकडे नागपूर शहरातील तारा मैदान, विडीपेठ, चक्रधरनगर मैदान, राजीव गांधी पार्क या मैदानांवर अतिक्रमण करून खाजगी क्लब चालविणे, दारू आणि नशा करणे, तसेच रात्रीच्या वेळी अवैध धंदे करणे अशा प्रकारची कृत्ये सुरू असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरातील मुलांना खेळण्यासाठी हक्काची मैदाने उपलब्ध होत नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मैदानांची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि नागपूर शहरातील विविध मैदानांवर करण्यात आलेले अतिक्रमण काढून खाजगी क्लब चालविण्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-१२-२०२५) : (**१) होय, हे अशंत: खरे आहे. सदर बाबतीत स्थानिक वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

नागपूर शहरातील तारा मैदान, बिडीपेठ, चक्रधर मैदान, राजीव गांधी पार्क या मैदानांवर नागपूर महानगरपालिकेतर्फे पाहणी करण्यात आली असता, तारा मैदान, बिडीपेठ या मैदानावर सुभेदार आखाडा शिवकालीन युध्दकला, हॉर्स रायडिंग व बॉक्सींग प्रशिक्षण केंद्र आहे.

चक्रधरनगर मैदानाच्या उत्तर पूर्व भागात फार जुने घर असून त्याच कोप-यात पुरातन हनुमान मंदिर व समाजभवन असून दक्षिण पूर्व भागात गजानन क्रिडा मंडळ यांचेव्दारे कबड्डी खेळाचा सराव चालतो तसेच मैदानाच्या दक्षिण पश्चिम कोपऱ्यात दुर्गा मंदीर असुन तेथे शासकिय निधीतून शेडचे बांधकाम झाले आहे.

राजीव गांधी पार्क या मैदानावर ऐश्वर्या बहुउद्देशिय संस्था मार्फत संचालित म.न.पा. संत मोतीदास बाबा वाचनालय व श्री. मोहनजी मते, मा.वि.स.स. यांच्या निधीतुन बाथरुमचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच मैदानाच्या मोकळया जागेत जिम व खेळाचे मैदान आहे.

उपरोक्त तिन्ही मैदानात परिसरातील मुलांना खेळण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. परंतु ज्यावेळी मैदानांवर खेळाडू नसतात त्यावेळी तिथे असामाजिक तत्त्वांचा वावर दिसून येत असल्यामुळे पोलिस विभागाला कायदेशिर कारवाई करणेकरीता महानगरपालिकेतर्फे दिनांक २५/०२/२०२५ रोजी कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातील वसतिगृहांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आलेले अनुदान

**(३७) ३०१५ (२९-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हापरिषदेच्या समाज कल्याण विभागातील वसतिगृहांनी साहित्य खरेदीची बिले सादर केली नसताना वसतिगृहांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे अनुदान जमा करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२७-११-२०२५) :** (१) नाही,

सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहे ही योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत नाशिक जिल्हात स्वयंसेवी संस्था संचलित एकूण १२५ अनुदानित वसतिगृहे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यस्थितीत ११५ अनुदानित वसतिगृहे कार्यरत आहेत. सदर वसतिगृहांचे व्यवस्थापन किंवा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक या कार्यालयाकडून साहित्य खरेदी केल्याचे कोणतेही देयके सादर करण्यात आलेले नाही. तसेच सदर अनुदानित वसितगृहांच्या बँक खात्यात डीबीटी (DBT) व्दारे अनुदान जमा करण्यात आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लमाणतांडा (ता. अंबाजोगाई, जि. बीड) या गावाच्या नावात काळवीट लमाणतांडा असा बदल ऑनलाइन मध्ये करण्याबाबत

**(३८) ३०२८ (३०-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळवीट लमाणतांडा (ता. अंबाजोगाई, जि. बीड) या गावचे नाव महसूली क्षेत्रातील ऑनलाईन प्रणालीमध्ये दिसत नसून फक्त लमाणतांडा अशा नावाचा उल्लेख दिसून येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूली क्षेत्रातील ऑनलाईन प्रणालीमध्ये गावाच्या नावाचा काळवीट लमाणतांडा असा संपुर्ण उल्लेख दिसत नसल्याने सदर ठिकाणच्या नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी येत असून नागरिक शासनाच्या विविध योजनेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काळवीट लमाणतांडा गावाच्या नावाची दुरुस्ती महसूली क्षेत्रातील ऑनलाईन प्रणालीमध्ये करण्याबाबतची मागणी तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावाचे नावात दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

महसुली क्षेत्रातील ऑनलाईन प्रमाणीमध्ये काळवटी लमाणतांडा अशा नावाचा उल्लेख आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये महावितरण कंपनीकडून मुंबई वगळता घरगुती, वाणिज्यिक आणि कृषी पंपधारक शेतकरी यांच्याकडे देयके थकीत असल्याबाबत**

**(३९) ३०९३ (२७-०४-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये महावितरण कंपनीकडून मुंबई वगळता घरगुती, वाणिज्यिक आणि कृषी पंपधारक शेतकरी अशा सुमारे पावणेतीन कोटी पेक्षाही अधिक ग्राहकांना वीजपुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० पूर्वी १० हजार कोटी रुपये असलेली थकबाकी मात्र गेल्या दीड दशकात सन २०२४ च्या आकडेवाडीनुसार रक्कम रुपये ९८ हजार ८०४ कोटी इतकी असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकबाकीदाराकडून सदरहू रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

महावितरणतर्फे सुमारे ३.१५ कोटी ग्राहकांना वीज पुरवठा केला जात आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर बातमी दैनिक सकाळ या वृत्तपत्रात दिनांक २१.०१.२०२५ रोजी प्रकाशित झाली होती. माहे मार्च-२००९ मध्ये महावितरणची लघुदाब व उच्चदाब चालू वीज ग्राहक आणि कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी रु.१२,२७५ कोटी एवढी होती. सद्य:स्थितीत माहे डिसेंबर, २०२४ अखेर ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी रु.९७८५२ कोटी एवढी आहे. यामध्ये कृषी ग्राहकांची थकबाकी रु.७५,५७६ कोटी असून उर्वरित ग्राहकांची थकबाकी रु.२२,२७६ कोटी इतकी आहे.

(३) जे वीज ग्राहक वीज देयक भरणा मुदतीत करीत नाहीत अशा थकबाकीदार ग्राहकांना महावितरणव्दारे वीज देयक भरणासंबंधी पाठपुरावा केला जातो. थकबाकीदार ग्राहकांच्या भ्रमणध्वनींवर / तसेच call centre मार्फत वीज देयक भरणा करण्याबाबत सूचना देण्यात येतात. विद्युत कायदा २००३ नुसार कलम ५६ अन्वये पूर्व सूचना (नोटीस) देऊन थकबाकीदार ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत केला जातो.

शासकीय पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा या ग्राहकांच्या थकीत वीज बिलांबाबत OTS योजना शासनाने माहे जानेवारी-२०२३ मध्ये मंजूरी केली असून या योजनेअंतर्गत शासनाने रु.४३३९.२५ कोटी वीज बील थकबाकीपोटी महावितरणला दिले आहेत. कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या उच्चदाब व लघुदाब ग्राहकांच्या (कृषी आणि सार्वजनिक पाणी पुरवठा ग्राहक वगळून) थकबाकी वसुली करिता "महावितरण अभय योजना-२०२४" ही योजना सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या पाणीसाठ्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत**

**(४०) ३१५६ (२८-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये प्रकल्पामध्ये अनुज्ञेय होणाऱ्या पाण्यातून अस्तित्वात असलेल्या धरणाच्या उर्ध्व बाजूस कोणताही नविन प्रकल्प घेण्यात येवू नयेत याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय मानक ५२७७ भाग-१ १९६९ मधील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात भविष्यकालीन योजनांसाठी पाणी आरक्षित करता येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्ध्व पेनगंगा प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत असणारी पाण्याची तूट भरुन काढण्यासाठी प्रकल्पातील पाणीसाठा व पाणी वाटपाच्या पुन:नियोजन व पुनर्विलोकनाची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी उर्ध्व पेनगंगा प्रकल्पासाठी पाणीसाठ्याच्या पुन:नियोजन व पुनर्विलोकन प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

शासन पत्र दिनांक १७ जानेवारी, २००८ मध्ये यापुढे ईसापुर धरणांच्या पाणलोट क्षेत्रात भविष्य कालीन योजनांसाठी पाणी आरक्षीत करता येणार नाही असे नमूद केलेले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा पुनर्नियोजन व पुनर्विलोकन प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता. प्रस्तावामध्ये अंतर्भूत असलेल्या खरबी बंधारा बांधून १०९ दलघमी पाणी बोगद्याद्वारे प्रवाही पध्दतीने इसापूर धरणात वळविणे, पैनगंगा नदीवर उच्च पातळी बंधारे बांधणे व सापळी धरण रद्द करणेबाबत शासन स्तरावरुन मान्यता दिलेली आहे.

उर्वरीत गोजेगाव उपसा योजना (९७ दलघमी) व दिगडी उपसा योजना (५८२ दलघमी) या योजनेस पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त असून दोन्ही योजनांसाठी मंजूर सहाव्या सुप्रमा प्रस्तावात सर्वेक्षण व अन्वेषणासाठी तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण विभागातील विविध शासकीय दूध योजनेमधील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणी लागू करणेबाबत**

**(४१) ३१९१ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण विभागातील विविध शासकीय दूध योजनेमधील काही सेवानिवृत्त व काही कार्यरत कर्मचारी यांना सन १९९६ मधील पाचवा वेतन आयोगापासून वेतनश्रेणी चुकीची झाल्याने आजतागायत ७ व्या वेतन पर्यंत वेतनश्रेणीत तफावत निर्माण झाल्याने सदर कर्मचाऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुनही अद्यापी कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुग्ध व्यवसाय विभागांतर्गत अमरावती विभागातील अनेक कर्मचारी सुधारित वेतन श्रेणीवर सेवानिवृत्त झाले आहेत व कार्यरत असलेले कर्मचारी सदर वेतनश्रेणीचा दुसरा व तिसरा लाभ घेत आहेत, मात्र कोकणातील सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अमरावती विभागाप्रमाणे कोकणातील शासकीय दुग्ध योजनेतील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीचा लाभ मिळावा याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) अमरावती विभागातील वीजतंत्री पदावरील ज्या कर्मचाऱ्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे मूळ अर्ज दाखल केले होते, त्यांनाच मा.न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार व शासन मान्यतेने लाभ देण्यात

आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोकणामध्ये वस्तू व सेवा कर यामधील वाढीच्या अनुषंगाने मापदंडामध्ये वाढ करणेबाबत

**(४२) ३१९६ (१९-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणामध्ये पाणी टंचाईच्या अनुषंगाने छोटे-छोटे सिमेंट नाला बंधारा व लघु पाटबंधारे योजना प्रस्तावीत करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांचा पाणीसाठा कमी असून या योजना सन २०२० पर्यंत शासनाच्या जलसंपदा विभागाच्या प्रचलीत शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१८ च्या मापदंडामध्ये यशस्वी ठरत होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूसंपादन जमिनीच्या दरामध्ये दरवर्षी वाढ होणे, स्वामित्व शुल्क मध्ये रु.२०० ब्रास वरुन रु ६०० प्रति ब्रास अशी वाढ होणे, वस्तू व सेवा करामध्ये पूर्वी ५% आकारण्यात येत होते आता १८% कर आकारण्यात येत आहे, सदर योजनांची अंदाजपत्रके बनविण्याच्या अद्यावत दरसूची लागू करण्यात आली आहे त्यामुळे योजनांची अंदाजपत्रकीय किंमत वाढून योजना मापदंडामध्ये अयशस्वी ठरत आहेत, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, कोकणामध्ये उक्त योजनांची गरज असूनही योजना मंजूर होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर भूसंपादन स्वामित्व शुल्क व वस्तू व सेवा कर यामधील वाढीच्या अनुषंगाने मापदंडामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१७-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.
असफल योजना मंजूर करताना शासन स्तरावर प्रशासकीय व तांत्रिकदृष्ट्या अडचणी उद्भवतात. योजना शासनाच्या प्रचलित आर्थिक मापदंडामध्ये असफल होत असल्याने सदर योजना मंजूर होण्यामधील कालापव्यय होतो.
(५) जलसंपदा विभाग यांची सन २०२२-२०२३ ची दरसूची ०१.०६.२०२२ पासून लागू झाली आहे. त्यामुळे मापदंड सुधारीत करणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. सदर निर्देशानुसार मापदंड सुधारित करणेबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागास सादर करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाने ग्रामीण क्षेत्रातील सन २०१६-१७ ते सन २०२४-२५ पर्यंतच्या जमिनीच्या बाजारमूल्याची (Ready Reckoner) वर्षनिहाय वाढीची टक्केवारीची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत महसूल व वन विभागास कळविले आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर मापदंड सुधारित करण्याबाबतची पुढील कार्यवाही जलसंपदा विभागामार्फत करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिवतर-कोडबा येथील नामदरेवाडी लोकवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याची पुनर्बांधणी करणेबाबत

**(४३) ३२११ (२४-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिवतर-कोडबा येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत धरणाच्या कामासाठी केलेल्या खोदकामामुळे नामदरेवाडी लोकवस्तीकडे जाणारा रस्ता खचलेला असून गावकऱ्यांच्या दळणवळणाचा मार्ग

बंद झाल्याने सदर रस्त्याची पुनर्बांधणी करावी यासाठी लोकप्रतिनिधी तसेच शिवतर ग्रामस्थ शिक्षण संस्था, मुंबई यांनी दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.मृद व जलसंधारण मंत्री तसेच मा.सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर नामदरेवाडी लोकवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याची पुनर्बांधणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१८-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याची पहाणी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, दापोली उपविभाग तसेच जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग खेड यांच्याकडून करण्यात आली आहे. प्रत्यक्ष पहाणीनुसार जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग खेड यांच्यामार्फत अंदाजे रक्कम रु.१.५० कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून कार्यवाहीसाठी विभागीय कार्यालयास पाठविण्यात आले आहे. परंतु निधीची उपलब्धता नसल्यामुळे काम हाती घेण्यात आले नसल्याबाबत जि.प.बांधकाम उपविभाग, खेड यांच्या मार्फत कळविण्यात आले आहे. तसेच उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, दापोली या उपविभागाकडून मोरीची (CD Work) पुनर्बांधणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रोळी येथील कन्नमवार नगर -२ मधील मार्केटसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत

**(४४) ३२२७ (०१-०५-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी येथील कन्नमवार नगर -२, विकास हायस्कुलच्या बाजुस असलेला भूखंड मार्केटसाठी आरक्षित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वाढता विकास व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सद्य:स्थितीत आरक्षित असलेल्या मोकळया भूखंडवर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मार्केटसाठी आरक्षित असलेला भूखंड अदयावत मार्केट निर्माण करुन नागरिकांसाठी खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे. बृहन्मुंबई मंजुर विकास योजना-२०३४ नुसार कन्नमवार नगर-२, विकास हायस्कूल लगतचा सव्हे क्र. १३३/ सि.टी.एस. क्र.३५६ (भाग) हा २४२५ चौ.मी क्षेत्रफळाचा भूखंड किरकोळ मंडईकरिता (ESA१.२) नामनिर्देशित आहे.

(२) व (३) सदरचा भुखंड विकसीत करण्याकरीता समुचीत प्राधिकरण हे बृहन्मुंबई महानगरपालिका आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानुसार सदर भूखंडावर अनेक दुकान गाळे व मासळी शेड आहे. सदर भूखंडावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याकरिता 'एस' विभाग कार्यालयामार्फत भूखंडावरील बांधकामांचा टोटल स्टेशन सर्व्हे करण्यात आलेला असून त्यानुसार बाधीत बांधकामधारकांची पात्रता/अपात्रता निश्चित करून नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्यात येईल. तदनंतर, मंडई भूखंडाचे सर्वेक्षण करुन क्षेत्रफळ निश्चिती करुन महानगरपालिका वास्तूविशारद यांच्याकडून आराखडे तयार करण्यात येतील व महानगरपालिका इमारत बांधकाम विभागामार्फत मंडईचे बांधकाम करण्यात येईल असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे-अहिल्यानगर -शिर्डी -नाशिक या ८० किलोमीटर अंतर वाढवणाऱ्या मार्गाच्या प्रस्तावाबाबत

**(४५) ३२२९ (२७-०४-२०२५). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-संगमनेर-नाशिक अशा सरळ प्रस्तावित असलेल्या रेल्वे मार्गाचे ३० टक्के भूसंपादन झाले असताना पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक हा ८० किलोमीटर अंतर वाढवणारा व अधिकचा एक तास वेळ वाया जाणाऱ्या मार्गाची आवश्यकता नसल्याने या प्रस्तावाला लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शवित आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्य रेल्वेच्या नवीन प्रस्तावाला विरोध वाढत असल्याने पूर्वी ३० टक्के भूसंपादन केलेल्या पुणे-संगमनेर-नाशिक रेल्वे मार्ग करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, नाशिकहून पुण्याला मनमाड मार्गे जाऊ नये यासाठी नाशिक-सिन्नर- संगमनेर-नारायणगाव-मंचर-पुणे या सरळ मार्गाला राज्यशासनाच्या महारेल कंपनीने निश्चित केले असतानाही नवीन प्रस्तावित ८० कि.मी. वाढीव व एक तासाचा प्रवास वाढवणाऱ्या प्रस्तावास शासनाने स्थगिती देऊन पूर्वीचाच मार्ग अधोरेखित करण्यात येणार आहे काय,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-१२-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

महारेलने दिनांक २१.०५.२०२१ रोजी रेल्वे मंत्रालयाला सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला.

महारेलने तयार केलेल्या अलाइनमेंटमध्ये, नाशिक ते पुणे असा हा मार्ग सिन्नर-संगमनेर-नारायणगाव-राजगुरुनगर मार्गे नेण्याची योजना आहे.

सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून मंत्रिमंडळाची मान्यता अद्याप मिळालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील सोनू सर्व्हिसेस कंपनीने महावितरण कंपनीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांने वेतन न दिल्याबाबत

**(४६) ३२३७ (२७-०४-२०२५). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सोनू सर्व्हिसेस कंपनीने महावितरण कंपनीसाठी खाजगी लोक पुरवण्याचे कंत्राट घेतले असून त्यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांची मागील सात महिन्यांची वेतन न दिल्याने या खाजगी कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीतील कर्मचाऱ्यांनी सोनू सर्व्हिसेस या कंपनीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार महावितरण कंपनीसाठी काम करणाऱ्या सोनू सर्व्हिसेस या कंपनीची सखोल चौकशी करून वीज महामंडळासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन देऊन या कंपनीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

करमाळा उपविभागातंर्गत दोन बाह्यस्त्रोत कामगारांनी तक्रार करमाळा पोलिस स्टेशन येथे दाखल केलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

करमाळा उपविभागाअंतर्गत २ बाहयस्त्रोत कामगारांनी परस्पर करमाळा पोलिस स्टेशन येथे में. सोनू सव्हिसेस यांच्या विरोधात फसवणुकीबाबत एफआयआर क्र.५/२०२५ दिनांक ०३.०१.२०२५ व क्र.६२/२०२५ दिनांक २८.०१.२०२५ नुसार तक्रार दाखल केलेली आहे.

(३) करमाळा उपविभाग येथील बाहयस्त्रोत पध्दतीने काम करणा-या कंत्राटी कामगाराच्या हजेरी व वेतनाबाबत अनियमितता झाल्याबाबतची तक्रार सोलापूर मंडल कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पत्र क्र.अअ/सोमंका/मासंवि/गोप/२८ दिनांक २२.०१.२०२५ नुसार सदर अनियमिततेबाबतचा अहवाल अधिक्षक अभियंता, सोलापूर मंडल यांच्यामार्फत मागविण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने बार्शी विभागामार्फत काअ/ बार्शी/मासंवि/गोप/२३ दिनांक ३०.०१.२०२५ नुसार चौकशी समिती नेमण्यात आलेली असुन त्यांचा अहवाल प्राप्त झालेला असून त्या अहवालाच्या अनुषंगाने मे. सोनू सव्हिर्सेस सोलापूर या एजन्सीचे कार्यादेश क्र.अअ/सोमका/मासंवि/गोप/९६ दिनांक १८.०३.२०२५ नुसार दिनांक १९.०३.२०२५ पासून सोलापूर ग्रामिण विभाग, पंढरपूर विभाग व बार्शी विभागाचे का.र्यादेश रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच सदर एजन्सीला काळ्या यादीत समावेशनाचा प्रस्ताव मुख्य अभियंता, बारामती यांचे पत्र क्र. मुअ/बाप/तांत्रिक ५१ दिनांक १७.०४.२०२५ अन्वये प्रादेशिक संचालक, महावितरण, पुणे यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरे खुर्द (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) येथील प्रवरा नदीच्या प्रदूषणात वाढ झाल्याबाबत**

**(४७) ३३०६ (२७-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरे खुर्द (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) येथील प्रवरा नदीत ओढया-नाल्याद्वारे रसायन मिश्रित व विषारीजन्य पाणी सोडले जात असल्यामुळे नदीतील लाखो मासे मृत्यूमुखी पडल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी प्रदुषित पाणी नदीत सोडल्याने नदीकाठावर सर्वत्र मळी व मृत माशांमुळे दुर्गंधी पसरली असून त्याठिकाणच्या अनेक गावांना नदीतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच प्रवरा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार प्रवरा नदीपात्रात केटी बंधाऱ्याजवळ मासे मृत झाल्याबाबतची तक्रार माहे जानेवारी, २०२५ रोजी उप-प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडे प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणी दरम्यान प्रवरा नदीत बंधाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणात मासे मृत झाल्याचे आढळून आले होते.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पाथरे खुर्द (ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) येथील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचा अहवाल सद्यस्थितीत त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीदरम्यान मे. अशोक सहकारी साखर कारखाना लि. अशोकनगर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर यांचे काळया रंगाचे सांडपाणी प्रवरा नदीच्या मौजे

पाथरे खुर्द या गावाच्या वरील बाजुतील नैसर्गिक ओढ्यास येवून मिसळत असल्याचे निदर्शनास आले होते.

त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक १३/०२/२०२५ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून दिनांक ०६/०३/२०२५ रोजी १० लाख रु. बँक हमी जप्तीचे आदेश पारीत केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेऊर (ता. करमाळा जि.सोलापूर) येथे ऊर्जा विभागाचे नवीन विभागीय कार्यालय सुरु होण्याबाबत**

**(४८) ३३३७ (२७-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात विजेची मोठ्या प्रमाणावर मागणी असून विभागाशी संबंधित कामकाजासाठी स्थानिक शेतकरी, नागरिक व विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांना बार्शी येथे सात्यत्याने ये-जा करणे शक्य नसल्याने दिनांक २० जानेवारी २०१६ रोजी तत्कालीन ऊर्जा मंत्री महोदयांनी झालेल्या बैठकीत बार्शी विभागाचे विभाजन करून जेऊर येथे नवीन विभागीय कार्यालयास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन विभागीय कार्यालय निर्मितीचे सर्व निकष पूर्ण होत असल्याने मुख्य अभियंता, बारामती परिमंडळ, बारामती यांनी जेऊर येथे ऊर्जा विभागाचे नवीन विभागीय कार्यालय होणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जेऊर येथे नवीन विभागीय कार्यालय प्रस्तावास तातडीने मंजुरी मिळण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) बार्शी विभागाचे विभाजन करुन मौजे जेऊर येथे नवीन विभागीय कार्यालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीस प्राप्त झाला आहे. महावितरण कंपनीने मपुक आदेश क्र. २९ दिनांक ०४.११.२०१० अन्वये प्रसृत प्रस्ताव ग्राहक मानंकाचा निकष पूर्ण करीत आहेत. तरी कपंनीची आर्थिक परिस्थिती व आर्थिक दायित्वाचा विचार करुन सदर प्रस्तावावर महावितरण कपंनी स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यकांना मानधन मिळण्याबाबत**

**(४९) ३३४० (२५-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राम रोजगार सेवकांना दरमहा ८ हजार मानधनासह प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय झाला असूनही २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यकांना मानधन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने या सहाय्यकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागून कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करुन विकासाची महत्त्वाच्या योजनेकडे लक्ष देऊन त्वरित मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२७-०६-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण पातळीवर कार्यरत ग्रामरोजगार सहाय्यक यांना प्रतिमाह रू.८०००/- सुधारित मानधन व इतर अनुषंगिक भत्ते देण्यासंदर्भात दिनांक ०३.१०.२०२४ रोजी शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगिक अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची बाब विभागाकडून कार्यवाहीत आहे.

शासनाच्या दिनांक ३१.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ग्रामरोजगार सहाय्यकांना प्रचलित पद्धतीने मानधन अदा करण्याच्या सूचना आयुक्त कार्यालय, नागपूर यांना दिल्या असून त्यानुसार मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर शहरातील पथदिव्यांची झालेली दुरवस्था

**(५०) ३३४३ (०१-०५-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महानगरपालिकेने शहरातील पथदिवे बसवणे आणि त्याची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी ईईएसएल कंपनीसोबत करार केला असून मात्र ही कंपनी आपली जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरल्याने शहरातील अनेक भागात वीज नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर शहरातील पथदिव्यांची दुरवस्था होण्यामागे कोणते कारण असून पथदिवे कधीपर्यंत दुरुस्त करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ईईएसएल कंपनीने आपला करार पूर्ण न केल्याबद्दल तसेच पथदिवे दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) लातूर महानगरपालिका, लातूर व ईईएसएल कंपनीमध्ये नवीन ऊर्जा बचतीचे धोरणानुसार लातूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथदिवे देखभाल दुरुस्तीसाठी सन २०१९ मध्ये सात वर्षासाठी करार करण्यात आला.

ईईएसएल कंपनीने त्यांची थकीत देयके अदाई न झाल्याने दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३ पासून पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम बंद केले.

राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ईईएसएल कंपनीने केलेली कामे, कंपनीने दिलेल्या सेवा व शासनाने तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या निधीची अदायगी या सर्व बाबींचे प्रचलित नियमानुसार त्रयस्थ संस्थेव्दारे लेखापरिक्षण करण्याबाबत दिनांक ११.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांना कळविण्यात आले आहे. त्रयस्थ संस्थेकडून लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ईईएसएल यांचे समवेत झालेल्या कराराबाबत आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल. तसेच शहरांमध्ये पथदिवे बसविणे व त्याची देखभाल करणे हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे मुलभूत कार्य असल्याने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पथदिवे बसविण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद

प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांना देण्यात आले आहेत.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.